राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. पी. एस. पवार
(एम.एस.)
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : crs_d83@yahoo.com
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड,पुणे-१

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/मृत्यु नोंदणीबाबत/10417-10451 /२०१३, दिनांक 25 सप्टेंबर २०१३

प्रति ,
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद, ..............(सर्व)

कार्यकारी आरोग्य अधिकारी
तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल,
मुंबई.

विषय :- उत्तराखंड येथील माहे जुन २०१३ मधील नैसर्गीक आपत्तीमध्ये गहाळ झालेल्या व्यक्तिंची मृत्यु नोंदणीबाबत प्रक्रिया.

संदर्भ - भारताचे महानिबंधक यांचे पत्र क्रं.१/२/उत्तराखंड/२०११-व्हीएस-सीआरएस/७६७, दिनांक ०६/०९/२०१३.

उत्तराखंड येथे माहे जुन २०१३ नैसर्गीक आपत्ती ओढवून ब-याच नागरीकांचा मृत्यु झाला अथवा ते गहाळ झाले. या संदर्भात तीन वेगवेगळया ठिकाणच्या रहिवाशांसाठी तीन प्रक्रिया निश्चित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये इतर राज्याच्या रहिवाशांसाठी प्रक्रिया क्रं.३ मध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

तेव्हा सदरील परिपत्रक आपले अधिनस्त सर्व निबंधकांना वितरीत करण्यात यावे व वरील नैसर्गीक आपत्तीमध्ये महाराष्ट्र राज्यातील त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरीक बेपत्ता/गहाळ झाले असल्यास त्यांचे नातेवाईकांना ही प्रक्रिया समजावून सांगण्यात यावी. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अशा नागरीकांची मृत्युची नोंद ही बेपत्ता/गहाळ झाल्याचे ठिकाणीच होणार आहे. याची कल्पना त्यांना देण्यात यावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे -१

प्रत माहितीस्तव सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव

E:\83\ORGI.doc